REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# वर्धा जिल्हा परिषद अंतर्गत शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येण्या-या योजना विषयक समस्या व शिक्षण विषयक अध्ययन

डॉ. अनिल वि. सुरकार
व्यवसाय व्यवस्थापन व प्रबंधन विभागप्रमुख
लोक महाविद्यालय, वर्धा.

## साराशं



प्रस्तुत संशोधन हे वर्धा जिल्हा परिषद अंतर्गत शेतकऱ्यांकरीता राबविण्यात येणाऱ्या योजनांचे आर्थिक अध्ययन आहे. भारत हा कृषीप्रधान देश आहे. जास्तीत जास्त लोकांचे जीवन शेती व्यवसायाशी निगडीत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा हा शेती उत्पादनाशी संबंधीत आहे. त्यामुळे हवामानानुसार शेतीत अन्नधान्याचे उत्पादन, उत्पादीत मालाचे वितरण शेतकऱ्यांना मिळणारे उत्पादन मुल्य याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या परिश्रमावरच विशेषत: शेतमालाचे उत्पादन अवलंबून असल्यामुळें शेतकऱ्यांचे जीवनमान त्यांचे सामाजिक प्रश्न, त्यांची आर्थिक समस्या तसेच शेतमालाचे विपणन करतांना येणाऱ्या अडचणी या व्यतिरिक्त शेतकऱ्यासमोर अनेक प्रश्न निर्माण होत असतात. त्या समस्यांचे सहानुभूतीपूर्वक विचार करुन शासनाने उचीत सहकार्य देण्याची भुमिका पार पाडली तर वर्धा जिल्हा परिषद अंतर्गत शेतकऱ्यांकरीता राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या त्यांना निश्चितच फायदा होऊ शकतो.

## प्रस्तावना

भारतातील स्थानिक शासन हे परंपरागत शासन आहे. स्थानिक शासन हे प्राचीन काळापासून अस्तित्वात होते याचा उल्लेख प्राचीन ग्रंथामध्ये आढळून येते. प्राचीन साहित्यामध्ये ग्रामसभा असल्याचा उल्लेख आढळून येतो. वैदिक, मौर्य, चोल व बुद्धकालीन जातक कंथामध्ये कौटील्याच्या अर्थशास्त्रात इ. स. पूर्व तिसऱ्या शतकात आलेल्या ग्रीक प्रवासी मॅगेस्थेनीसाच्या लिखानात व मोगल काळातील ग्रामसभा अस्तित्वात होत्या. गावाचा प्रमुख 'ग्रामिणी' लोकांनी निवडून दिलेला असे. कालांतराने ग्रामिणी हा वंशपंरापरागत नियुक्त केला जाऊ लागला. प्राचीन ग्राम व्यवस्थेचा पाया मर्यादित स्वरूपाचा होता. पंरपरागत अधिकारावर सत्तासंबंध अवलंबून होते. त्यामुळे त्यांची कार्येही मर्यादित स्वरूपाचीच होती. स्थानिक प्रशासनामध्ये व्यक्तीचा सहभाग आणि त्यातून व्यक्तीचा विकास व समाजभिमुख राजकीय शिक्षण ही कल्पना त्यामागे नव्हती. त्या तुलनेत आजची

ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था ही ब्रिटीशांचा वारसा असून तीचे स्वरूप सर्व समावेशक व विकसीत आहे.

**सारणी क्रमांक १: वर्धा जिल्हा परिषद अंतर्गत राबविण्यात येण्या-या योजना विषयक समस्या व शेतकऱ्यांच्या शिक्षणा दरम्यान असलेल्या संबंधांचे विश्लेषण**

| योजना विषयक समस्या | शिक्षण | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अशिक्षित | प्राथमिक | माध्यमिक | उच्च माध्यमिक | स्नातक | स्नातकोत्तर | इतर | |
| होय | १५२ | १०३ | २०७ | ९९ | ५३ | १२ | १४ | ६४० |
| | (२२.४) | (१५.१) | (३०.४) | (१४.६) | (७.८) | (१.८) | (२.१) | (९४.१) |
| नाही | ३ | २ | ३ | ६ | १३ | १० | ३ | ४० |
| | (०.४) | (०.३) | (०.४) | (०.९) | (१.९) | (१.५) | (०.४) | (५.९) |
| एकूण | १५५ | १०५ | २१० | १०५ | ६६ | २२ | १७ | ६८० |
| | (२२.८) | (१५.४) | (३०.९) | (१५.४) | (९.७) | (३.२) | (२.५) | (१००) |

कंसातील आकडे टक्केवारी दर्शवितात

| | Critical | Calculated |
|---|---|---|
| Chi Square Value | 12.592 | **104.102** |
| Degrees of Freedom | 6 | **6** |
| P Value | <0.05 | **<0.05** |

वरील **सारणी क्रमांक** १ वर्धा जिल्हा परिषद अंतर्गत राबविण्यात येण्या-या योजना विषयक समस्या व शेतकऱ्यांच्या शिक्षणा दरम्यान असलेल्या संबंधांचे विश्लेषण दर्शविण्यात आले आहे. प्रस्तुत सारणी ही द्विचलीय आहे, शेतकऱ्यांचे शिक्षण हे स्वतंत्र चल असुन नविन योजनांच्या फायदा घेण्यात समस्या येणे हे अवलंबित चल आहे. सारणीत स्वतंत्र व अवलंबित या दोन्ही चलांना क्रमशः सात व दोन गटात विभागण्यात आले आहे. शेतकऱ्यांचे शिक्षण व नविन योजनांच्या फायदा घेतांना समस्या येणे या चलांदरम्यान असलेल्या संबंधांचा आढावा काई वर्ग चाचणीच्या मदतीने घेतला असता असे निदर्शनास आले की, सारणीत ६ स्वतंत्र्यांशावर काई वर्ग मुल्य १०४.१०२ असुन ६ स्वातंत्र्यांश व ०.०५ सार्थकता स्तरावर मानक काई वर्ग मुल्य १२.५९२ आहे.

वरील माहिती वरून हे स्पष्ट होते की, सारणीतील काई वर्ग मुल्य हे मानक काई वर्ग मुल्यापेक्षा अधिक आहे. यावरून शेतकऱ्यांना नविन योजना घेतांना समस्या येणे व त्यांचे शिक्षण या चलांदरम्यान महत्वपूर्ण ($P<0.05$) संबंध असल्याचे स्पष्ट होते.

## निष्कर्ष,

वर्धा जिल्ह्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांना सर्व योजनाचा लाभ प्राप्त होत नाहीत. तथापी जिल्ह्यातील १००% शेतकऱ्यांच्या गावात शाळा उपलब्ध आहेत. बहुतांश गावामध्ये केवळ प्राथमिक स्तरा पर्यंत शिक्षणाची सोय उपलब्ध आहे.

सारणी क्रमांक १ मधून प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की, शेतकऱ्यांना नविन योजनाच्या लाभ प्राप्त होतांना समस्या येणे व त्यांचे शिक्षण या चलांदरम्यान महत्वपूर्ण **(Chi sq. = 104.102; P<0.05)** संबंध आहे. म्हणजेच उच्च माध्यमिक व त्यापेक्षा कमी स्तराचे शिक्षण असलेल्या अधिक शेतकऱ्यांना नविन नविन योजनाच्या लाभ प्राप्त होतांना समस्यांचा सामना करावा लागला.

## संदर्भ ग्रंथसूची


१) आवाळे मनोज, (२००३) पंचायत राज – कार्य– कायदा– योजना, अनुबंध प्रकाशन, पुणे.

२) आशीर्वादम ए. डी. आणि मिश्र कृष्णकांत, (२००२) राजनीती विज्ञान, एस. चन्द एण्ड कम्पनी लि. नवी दिल्ली.

३) ॲगर दर्बट, 'पेरिल्स ऑफ डेमॉक्रसी', (अनु.) सुराणा पन्नालाल : 'लोकशाहीचे धोके, १९६७. कोल जी. डी. एच., (१९९३) लोकल ॲण्ड रिजनल गव्हर्नमेंट, मॅकमिलन पब्लिशींग कम्पनी, न्यूयार्क

४) क्ये-जॉन, (१९६६) द अडमिनिस्ट्रेशन ऑफ द इस्ट इंडिया कम्पनी, इलाहाबाद.

५) कऱ्हाडे, बी. एम. (२०११) शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापूरे ॲन्ड कं. पब्लिशर, वर्धा.

६) कटारिया सुरेंद्र, (२००७) 'पंचायत राज संस्थाए', नेशनल पब्लिशिंग हाऊस, जयपूर, प्रथम संस्करण.

७) गोएल अरूणा, (२००३) एज्युकेशन ॲण्ड सोशिओ ऍकानामिक परस्पेक्टीव्हस ऑफ वूमन डेवलपमेंट ॲण्ड एम्पावरमेंट, दीप ॲण्ड दीप पब्लीकेशन्स, न्यू दिल्ली.

८) गोखले रामचंद्र महादेव, (१९७१) 'नागरिकशास्त्र व भारतीय राज्यपद्धती', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, आठवी आवृत्ती.

९) चोपडा, सरोज, बाला, (१९९३) प्राचीन मध्य व आधुनिक भारत स्थानिक शासन, राजस्थान हिंदी अकादमी, जयपूर.

१०) देवगांवकर श. गो. (२००७) पंचायत राज आणि सामुहिक विकास, श्री साईनाथ प्रकाशन, वर्धा.

११) दास्ताने संतोष, (२००४) महाराष्ट्र २००४, रामचंद्र दास्ताने आणि कम्पनी, पुणे.

१२) नांदेडकर व्ही. जी. (२००४) 'पंचायती राज एक विश्लेषणात्मक परामर्श', के. सागर प्रकाशन, पुणे.

१३) पाटील वा. भा. (१९९९) पंचायत राज्य, विद्या प्रकाशन, वर्धा.

१४) फ्रेजर आर. डब्ल्यू, (१९७४) ब्रिटीश इंडिया, न्यू दिल्ली.

१५) बर्थवाल सी. पी. (२००६) 'स्थानिय स्वशासन', सुलभ प्रकाशन, लखनौ संस्करण.
१६) बेनी प्रसाद, (१९७६) द स्टेट इन अन्साइन्ट इंडिया, अलाहाबाद.
१७) बोधनकर, सु., अलोणी, वि. व कुलकर्णी, मृ. (१९९३) सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, वर्धा, पहिली आवृत्ती.
१८) बोस ए. बी. (१९८७) एनसायक्लोपेडिया ऑफ सोशिल वर्क इंडिया, मिनिस्ट्री ऑफ वेलफेयर, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, न्यू दिल्ली.
१९) भोगले शांताराम, (१९९९) भारतातील स्थानिक शासन, विद्या प्रकाशन, पुणे.
२०) माहेश्वरी एस. आर. (२००९-१०) भारत मे स्थानीय स्वशासन, लक्ष्मीनारायण अग्रवाल प्रकाशन, आग्रा.